
# जे तपोतेजाचिया राशी...

**गायत्री सेवक, पुणे**

*डॉ. स्वर्णलता भिशीकर यांनी ३ मार्च २०२५ रोजी ऐहिक जगताचा निरोप घेतला. त्यांनी जीवनभर ज्ञान प्रबोधिनीच्या माध्यमातून विविध प्रकारचं समाजकार्य केलं. त्या मानसशास्त्रज्ञ होत्या. सर्वात महत्त्वाचं म्हणजे त्या अनेक साधकांच्या अध्यात्मक्षेत्रातील मार्गदर्शिका होत्या. त्यांच्या जीवनकार्याबद्दल थोडक्यात आढावा घेण्याचा हा प्रयत्न!*

---



‘आज तुझा वाढदिवस आहे. वाढदिवसाला मित्रमैत्रिणी भेटी आणून देतात, आईवडील नवीन कपडे घेतात, पण आपण नुसतंच घेऊ नये. वाढदिवसाला द्यायलाही शिकावं नि आपली सर्वात आवडती वस्तू एखाद्या व्यक्तीला द्यावी. मग तू आज कोणाला नि काय देशील ते ठरव...’ लताताई प्रज्ञाला सांगत होत्या. छोटाच पण किती महत्त्वाचा जीवनदायी संस्कार! प्रज्ञा जेरे सोलापूरच्या शाळेत शिकत असताना दोन वर्षं आमच्याजवळ प्रबोधिनीतच राहत होती. तिच्या वाढदिवशी घडलेला हा प्रसंग! अशा अनेक प्रसंगांचे ठसे अनेकांच्या मनावर उमटले आहेत...

**पार्श्वभूमी**

डॉ. स्वर्णलता भिशीकर हे नाव महाराष्ट्राला अपरिचित नाही. सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात सुमारे ५० वर्षांहून अधिक काळ काम केलेल्या लताताई महाराष्ट्रात, भारतात आणि परदेशातही सर्वदूर ओळखल्या जातात. मी आठवीत असताना ज्ञान प्रबोधिनीच्या प्रबोधशाळा या संध्याकाळी चालणाऱ्या अभ्यासवर्गांमध्ये येऊ लागले. तिथे लताताईंनी आम्हांला इंग्रजी शिकवलं. प्रबोधशाळा या उपक्रमाचा मुख्य हेतू देशसेवेत झोकून देऊन काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचं संघटन हाच होता. शास्त्र, गणित, इंग्रजी शिकणं ही दुय्यम गोष्ट होती. प्रबोधिनीचे संस्थापक डॉ. विनायक विश्वनाथ तथा आप्पा पेंडसे, लताताई भिशीकर, नलूताई गुजराथी, विद्याताई सप्रे, हेमाताई अंतरकर, नीलाताई देशमुख, रंजनाताई अभंग, पुष्पाताई आगाशे आणि १९८३मध्ये आप्पांनी देह ठेवल्यावर प्रबोधिनीचे द्वितीय संचालक डॉ. वसंत सीताराम तथा आण्णा ताम्हनकर अशा सर्वांचा अनौपचरिक सहवास आम्हांला मिळाला. त्यातून काही जणी प्रबोधिनीच्या कार्याशी जोडल्या गेल्या.

नववीत असल्यापासून आम्ही काही जणी युवती विभागातर्फे आमच्यापेक्षा लहान मुलींची क्रीडा दलं घेऊ लागलो. युवती विभागाचं नेतृत्व आधी लताताई आणि मग नलूताई करत होत्या. साप्ताहिक बैठकी, गडकोटांच्या सहली, गावोगाव झालेली मुलींची शिबिरं, पालखीतील सहभाग, गणेश विसर्जन मिरवणूक, तिळगुळ विक्री, रसमयी उद्योग, आयुर्वेद संशोधिका, अनेक प्रासंगिक उपक्रम, अभ्यास शिबिरं, विविध प्रांतांमधले अभ्यास दौरे, नैसर्गिक आपत्तीनंतरची मदतकार्यं अशा सर्व उपक्रमांमध्ये या सर्व तायांसह आम्ही हिरीरीने सहभागी होत राहिलो आणि नकळतपणे संवेदनशील माणूस म्हणून आणि कार्यकर्त्या म्हणून आमची घडण होत राहिली. या सर्वांकडे बघून देशासाठी समर्पण करण्याची प्रेरणा अंतःकरणात जागृत झाली आणि एकूण सुमारे २५ वर्षं मी प्रबोधिनीच्या विविध कामांशी संबंधित राहिले. त्यातील बहुतांश काळ लताताईंसह व्यतीत झाला. त्यांच्यासह काम करत खूप शिकायला मिळालं. हा लेख लिहून, त्यांच्याविषयी अंतःकरणात असलेली नितांत कृतज्ञता व्यक्त करण्याचा अल्पसा प्रयत्न!

**लौकिक परिचय**

लताताईंचा जन्म १ मे १९५१चा. जन्मस्थळ नागपूर. पाच वर्षांच्या असताना लताताई आईवडिलांसह कायम वास्तव्यासाठी पुण्याला आल्या. त्यांच्या आई कुसुमताई भिशीकर या राष्ट्र सेविका समितीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या होत्या. सात्त्विक, ईश्वरनिष्ठ व्यक्तिमत्त्व! अतिशय रसाळ रामायण कथन करण्यात त्यांचा हातखंडा होता. लताताईंचे वडील म्हणजे व्यासंगी, साक्षेपी पत्रकार, त्या वेळच्या तरुण भारतचे संपादक, संतसाहित्याचे अभ्यासक आणि ज्येष्ठ लेखक श्री. चं. प. (चंद्रशेखर परमानंद) तथा बापूसाहेब भिशीकर. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक म्हणून दीर्घ काळ काम करत होते. लताताईंना एक मोठी बहीण भारतीताई, धाकटा भाऊ आनंददादा व त्यापेक्षा धाकटी बहीण क्रांतीताई. लताताईंना अध्यात्माचं व समाजकार्याचं बाळकडू घरातूनच मिळालेलं. तसंच वाचनाचं वेडही घरातूनच लाभलं.

विमलाबाई गरवारे प्रशालेत शालेय शिक्षण चालू असतानाच ज्ञान प्रबोधिनी या पुण्यातील नामवंत शिक्षण संस्थेशी लताताईंचा संबंध आला. प्रबोधिनीचे संस्थापक संचालक आप्पा पेंडसे यांच्या जीवनाचा त्यांच्यावर विलक्षण प्रभाव पडला आणि त्यांच्या जीवनकार्याची दिशा निश्चित झाली. आप्पांच्या प्रदीर्घ सहवासातून मूळच्या कुशाग्र बुद्धियुक्त लताताईंच्या सुप्त चारित्र्यगुणांचा आणि कल्पनातीत क्षमतांचा विकास झाला. दैनंदिन जीवनात त्यांचा प्रत्यक्ष आविष्कार होण्यासाठी उत्तेजन लाभलं. लताताईंचं लौकिक शिक्षण योग्य दिशेने घडवण्यासाठी आप्पाचं मार्गदर्शन लाभलं. शालान्त परीक्षा उत्तम यशाने उत्तीर्ण झाल्यावर, तत्त्वज्ञान व मानसशास्त्र या विषयांत बी.ए. ही पदवी त्यांनी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण केली. मानसशास्त्रातील एम.ए. पदवीही प्रथम क्रमांकाने संपादन केली. नंतर 'वाचनवेगा'सारख्या अगदी आगळ्यावेगळ्या विषयावर अभ्यास करून त्यांनी शिष्यवृत्तीच्या बळावर 'विद्यावाचस्पती' (पीएच.डी.) पदवी संपादन केली.

**समर्पिता**

आप्पांचे रसरशीत, चैतन्यदायी, ध्येयप्रवण आचारविचार युवक-युवतींना राष्ट्रजीवनात उडी घेण्यास प्रेरित करणारे होते. स्वभावतः संवेदनशील व करुणामयी असलेल्या लताताईंनी लौकिकार्थाने प्रापंचिक जीवन न स्वीकारता, ज्ञान प्रबोधिनीद्वारे देशकार्यात जीवन वेचण्याचा संकल्प केला. समर्पित कार्यकर्त्याचं वर्णन लताताईंनी त्यांच्याच एका काव्यात केलं आहे. ते त्यांना तंतोतंत लागू पडतं-

ध्रुवापरी दृढ ध्येयप्रवणता
ऋजुसमर्थता कार्यशरणता
बहुत शोधुनी हे जीवनस्वर आज उमगले हो...
हिंदुभूमिच्या गौरवात मज श्रेय गवसले हो
समर्पणाचे शुभ्रकमल हृदयात विकसले हो...

...लताताईंची काव्यप्रतिभा अशी विलक्षण प्रासादिक नि समर्पित होती.

शालान्त परीक्षेच्या सुमारास लताताईंना विषमज्वर झाला. तो नंतर दोन वेळा उलटला आणि त्या वेळी औषधांच्या झालेल्या प्रचंड माऱ्याने त्यांची प्रकृती कायमची नाजूक झाली. शिवाय कालांतराने कावीळही झाली. पुढे पोटाचे आणि अन्य आजार वारंवार बळावत राहिले. शरीर साथ देत नसतानाही मानसिक सामर्थ्याच्या बळावर अनंत प्रकारचे ताण सहन करून त्या आयुष्यभर अखंड उदंड काम करत राहिल्या. गुरुदेव रानडे यांच्या बाबतीत अशी गोष्ट सांगतात की तब्येत चांगली आहे असा त्यांच्या आयुष्यातला एकही दिवस नव्हता. तरी त्यांचं साधन कधी चुकलं नाही. तसंच काहीसं लताताईंबाबतही म्हणता येईल. त्यांची पहाटेची साधना आणि कामात खंड पडला नाही. कामाचा झपाटाही विलक्षण असे. कोणाच्याही कोणत्याही कामाला त्यांनी कधी नकार दिला नाही.

**पुण्याच्या वास्तव्यातील कार्य**

पुण्यात असताना युवती विभागाच्या संघटनकार्यासह लताताईंनी प्रज्ञा मानस संशोधिकेतही काम केलं. १९८१नंतर प्रथम आप्पा आणि नंतर द्वितीय संचालक आण्णा ताम्हनकर या दोघांच्याही स्वीय साहाय्यिका म्हणून अतिशय समर्थपणे काम केलं. या कालावधीत डॉ. पां. वा. सुखात्मे, डॉ. वसंतराव व सुधाताई गोवारीकर, डॉ. ल. ना. गोडबोले, डॉ. ना. ह. आत्रेय,

श्री. कांतिभाई श्रॉफ, श्री. बाबूभाई कराणी, गो. नी. दांडेकर अशा समाजातील अनेक गणमान्य व्यक्तींशी लताताईंचे आत्मीय स्नेहसंबंध जुळून आले. १९८३ साली आप्पांच्या निधनानंतर प्रबोधिनीला निधिसंकलनाची मोठीच गरज होती. त्यातही त्यांचा मोठा पुढाकार होता.

सामाजिक क्षेत्रात झालेलं लताताईंचं काम फारच वैविध्यपूर्ण आहे. युवती विभागातर्फे झालेल्या उपक्रमांत आणीबाणी अभ्यास अभियान, मंजुश्री सारडा खून खटला विरोधातील अभियान, राजस्थानमधील रूपकुंवर सती अभ्यास दौरा या सर्व उपक्रमांमध्ये लताताईंनी विशेष वैचारिक भूमिका बजावली. पंजाबमध्ये प्रबोधिनीची सद्भावयात्रा गेली असताना, सुवर्णमंदिरात आणि अनेक गुरुद्वारांमध्ये लताताईंनी हिंदीमधून अभ्यासपूर्ण व आवाहनपर शबदकीर्तनं करून शीख बांधवांची मनं जिंकून आपलीशी केली.

सामाजिक कामाच्या निमित्ताने अमेरिकेत लताताईंचे काही दौरे झाले. तिथे त्यांनी अनेकांचा स्नेह जोडला. प्रबोधिनीच्या संस्कार पोथ्यांना अनुसरून संस्कार कार्यक्रम केले. दोन महिने अमेरिकेतील पेनसिल्व्हानिया युनिव्हर्सिटीत अतिथी व्याख्याता म्हणूनही काम केलं. देशा-परदेशांतले अनेक लोक विविध निमित्तांनी लताताईंशी जोडले गेले. त्यांपैकी अनेकांच्या व्यक्तिगत अडचणी सोडवण्यासाठीही लताताई स्वतःचा पुष्कळ वेळ नेहमीच देत राहिल्या. अनेक श्रांतांना त्यांच्यापाशी विसावा मिळाला.

भारतातील मोठमोठे उद्योग, बँका यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी व्यवस्थापन क्षेत्रातील बहुविध विषयांवरचे प्रशिक्षण वर्ग घेण्यासाठी प्रबोधिनीच्या प्रज्ञा मानस संशोधिकेतर्फे लताताई अनेक वर्षं जात असत.

**सोलापूर येथील कार्य**

१९८९ साली सोलापूरची 'बालविकास मंदिर' ही शाळा प्रबोधिनीकडे हस्तांतरित झाली आणि प्रबोधिनीच्या सोलापूर केंद्राचं प्रमुखत्व लताताईंकडे आलं. १९९०पासून आण्णाही सोलापूरला गेले. आण्णा व लताताईंच्या नेतृत्वाखाली सोलापूरला टप्प्याटप्प्याने राहिलेल्या चारुदत्त पालेकर, सुवर्णा गोंधळेकर (गोखले), कल्पना भालेकर (आठल्ये) आणि गायत्री सेवक या सर्व कार्यकर्त्यांच्या गटकार्यातून सोलापूरचं कार्य बहरत गेलं. माध्यमिक शाळेच्या इयत्ता सुरू करणं, वाढत्या कामासाठी अथक परिश्रमांनी आणि मोठ्या संघर्षाने शासनाकडून जागा प्राप्त करून घेणं झाल्यावर वास्तू बांधकाम, त्यासाठी निधिसंकलन अशी कामं झाली. पुढील काळात अध्यापक शिबिरं, शिशु-अध्यापिका विद्यालय, बालकामगार शाळा, बालविकास केंद्रं, पौरोहित्य विभाग असे अनेक उपक्रम सुरू झाले. शासनाच्या साक्षरता अभियान उपक्रमात सोलापूर जिल्ह्याचं प्रमुखत्व लताताईंनी समर्थपणे पेलून नेलं. सोलापूर शहरात आणि आजूबाजूच्या परिसरात अनेक ठिकाणी विविध विषयांवरील व्याख्यानांच्या माध्यमातून जनमानसाचं प्रबोधन त्यांच्याकडून होत राहिलं.

काही वर्षांतच सोलापूरच्या शैक्षणिक आणि सामाजिक वर्तुळात लताताईंना मोठं स्थान लाभलं. ते त्यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वगुणांनी प्राप्त केलं. त्यांना सोलापूरचा इतिहास-भूगोल पाठ असे. कोणाचा वाढदिवस केव्हा आहे आणि कोणाला कसला पुरस्कार मिळाला हे त्यांना नेमकं ठाऊक असे. अगदी योग्य संधी साधून त्या ते आनंदाने साजरे करत. छोट्या छोट्या प्रसंगांतून माणसं जोडण्याची त्यांची ताकद विलक्षण होती. प्रबोधिनीच्या माध्यमातून विविध वयोगटांसाठी जे उपक्रम चालू झाले, त्यांमध्ये त्यांचं अतिशय मोलाचं मार्गदर्शन असे.

सोलापूरला असलेल्या स्वामी माधवनाथांच्या अनुगृहीत साधकांच्या जोडीने लताताईंच्या पुढाकाराने १९९१च्या गुढी पाडव्यापासून १०-१२ जणांचं एक सत्संग केंद्र सुरू झालं. वर्ष-दोन वर्षांत त्या सत्संग केंद्रात विविध आध्यात्मिक संप्रदायांमधील सुमारे १५० साधक सहभागी होऊ लागले. लताताईंनी या सत्संगात क्रमाने दासबोध आणि ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील प्रवचनं केली. सोलापुरातील अनेक संप्रदायांमधील साधक परिवारांना एका छायेखाली आणण्याचं काम लताताईंनी अतिशय कुशलतेने केलं. 'साधू दिसती वेगळाले । परी ते स्वरूपी मिळाले ॥' याचा दाखला देत, विविध संतांच्या जीवनचरित्रांतील रसपूर्ण उदाहरणं प्रवचनांमधून सांगत, सर्वांचं गंतव्य एकच आहे, हे त्या सहजतेने पटवत. स्वर्णलतेच्या या कार्याला सद्गुरुकृपेचा स्वर्णस्पर्श आहे हे ठायीठायी जाणवत असे. शुद्ध परमार्थाच्या प्रसाराचं त्यांच्या सद्गुरूंचं कार्य त्यांनी अंगीकारलं होतं आणि अनेकांना बोटाला धरून विपरीत परमार्थापासून दूर नेऊन, योग्य मार्गावर आणून सोडण्याचं काम त्यांनी केलं. सोलापुरातील मंडळी पुण्यात स्वामी माधवनाथांच्या दर्शनाला गेली तर ते म्हणत, 'इथे कशाला येता? तिकडे लता आहे

ना!' असा सद्गुरूंचा प्रगाढ विश्वास लताताईंनी संपादन केला होता. सत्संग केंद्राच्या जोडीने प्रबोधिनीच्या शाळेतील विद्यार्थ्यांनाही त्या ध्यानाची गोडी लावत असत. सत्संग केंद्राच्या माध्यमातून ध्यान-सत्संग शिबिरं, संतांच्या स्थानी सहली, असेही उपक्रम नियमितपणे होऊ लागले. स्वामी माधवनाथांचे उत्तराधिकारी स्वामी माधवानंद (डॉ. माधव नगरकर) हेही दर वर्षी दोनदा सोलापूरला येऊ लागले.

**हराळी येथील कार्य**

सप्टेंबर १९९३मध्ये किल्लारीचा भूकंप झाला. सारा मराठवाडा हादरला. सोलापूर आणि पुणे केंद्रातून मदतकार्यासाठी कार्यकर्ते गेले. हराळी व नारंगवाडी या गावांमध्ये घरांचं आणि व्यवसायांचं पुनर्वसन प्रबोधिनीने करून दिलं. हराळीची शाळा, वसतिगृह, सौर प्रकल्प, फळप्रक्रिया प्रकल्प, कृषी प्रकल्प, साधक निवास या सगळ्या उपक्रमांच्या संचालनात आण्णांसह लताताईंचा प्रमुख सहभाग होता. साधक निवासाची मूळ संकल्पना लताताईंनी मांडली आणि त्याच्या आधारे अनेकानेक साधकांसाठी ध्यान-सत्संग शिबिरं त्यांनी तिथे अनेक वर्षं घेतली. पुण्याच्या डॉ. सुषमाताई वाटवे आणि बारामतीच्या प्रा. सरलताई बाबर या स्वामी माधवनाथांच्या ज्येष्ठ शिष्यांनी देह ठेवल्यावर त्यांच्या परिवारांमधील साधक मंडळीही लताताईंशी जोडली गेली होती. ते सगळेही या शिबिरांमध्ये सहभागी होत असत. विविध संप्रदायांच्या साधकांना साधनेसाठी आणि शांती, समाधान यांच्या प्राप्तीसाठी मोलाचं मार्गदर्शन लताताईंनी केलं. त्यामुळे त्यांच्याविषयी अनेकांना स्वाभाविकपणे मातृभाव निर्माण झाला. लताताईंच्या ठायी मात्र सेवाभाव आणि वात्सल्यभाव यांचा हृदयंगम संगम झालेला अनेकांना पाहायला मिळाला.

ज्ञान प्रबोधिनीच्या पुणे, सोलापूर, हराळी या सर्वच केंद्रांच्या ठिकाणी समाजोपयोगी कामाच्या उभारणीसाठी निधिसंकलन करण्यात लताताईंची अत्यंत महत्त्वाची भूमिका राहिली. त्यासाठी पत्रव्यवहार करणं, प्रस्ताव तयार करणं आणि प्रत्यक्ष भेटी घेऊन आवश्यक वाटाघाटी करणं या सर्व बाबतींत त्यांचा हातखंडा होता.

सामाजिक कामातील योगदानाबद्दल अनेक संस्थांनी लताताईंना विविध पुरस्कारांनी सन्मानित केलं हे अत्यंत गौरवास्पद आहे.

**साहित्यक्षेत्रातील योगदान**

मराठी, संस्कृत, हिंदी, इंग्रजी या भाषांवर लताताईंचं असामान्य प्रभुत्व होतं. फ्रेंच भाषाही त्यांना अवगत होती. इतिहास, मानसशास्त्र, शिक्षण या विषयांचा आणि यांशिवायही सर्व प्रकारच्या वाङ्मयाचा चौफेर व्यासंग त्यांनी केला. त्यांची प्रज्ञा आणि आकलनशक्ती अतिशय उच्च दर्जाची होती. समोरच्या श्रोतृवृंदापुढे वयोगटानुसार नि अन्य पार्श्वभूमीनुसार विषय फुलवत नेण्याची कला त्यांना सहज अवगत होती. सरस्वतीचा वरदहस्त त्यांना लाभला होता आणि त्यांच्या रसाळ नि प्रेरक वाणीतून व लेखणीतून त्याचे आविष्कार नित्य प्रकटत राहिले. एकटाकी ओघवतेपण आणि प्रासादिकता ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्यं म्हणता येतील.

कै. आप्पासाहेब पेंडसे यांचं 'एक अदम्य उत्कट चैतन्य' हे चरित्र, विवेकानंद केंद्रासाठी 'हिंदुतेजा जाग रे' हा स्वामी विवेकानंदांच्या विचारांच्या संकलनाचा अनुवाद असं सामाजिक क्षेत्रातील लेखन त्यांनी केलं. ज्ञान प्रबोधिनीच्या तीन शैक्षणिक ग्रंथांच्या निर्मितीमध्ये आणि पुणे व सोलापूर येथील कार्याच्या वार्षिक वृत्तलेखनात लताताईंचा अतिशय मोलाचा वाटा होता. आप्पांच्या प्रतिभेतून संस्कार विधींचं कालानुरूप पुनरुज्जीवन करण्याच्या उपक्रमात प्रबोधिनी आणि धर्मनिर्णय मंडळ यांच्या द्वारे तयार झालेल्या विविध संस्कार पोथ्यांच्या लेखनातही लताताईंनी महत्त्वाची भूमिका बजावली होती आणि अनेक विधींचं प्रत्यक्ष पौरोहित्यही त्यांनी केलं.

लताताईंची काव्यप्रतिभा विलक्षण प्रगल्भ असून काव्यातली शीघ्रताही वाखाणण्याजोगी होती. ज्ञान प्रबोधिनीत म्हटली जाणारी कितीतरी पद्यं त्यांनी रचलेली आहेत. त्या गीतांमधून त्यांचं जाज्वल्य देशप्रेम प्रत्ययाला येतं तशी तरलहृदयी स्वर्णलताही डोकावत राहते. त्यांनी रचलेली अनेकानेक पद्यं प्रबोधिनीत सगळे आनंदाने गातात. लताताईंना अभिनयगीतं बसवून घेण्यातही खूप रस होता. तो त्यांचा विरंगुळा होता. यांशिवाय अनेकानेक विषयांवरचे लेखही त्यांनी लिहिले. पत्रलेखन हा तर त्यांचा विशेष हातखंडा होता.

ललित क्षेत्रातही लताताईंनी लेखन केलं. 'यशोदा' या नावाने लिहिलेला त्यांचा 'देवचाफे' नावाचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला असून त्याला कुसुमाग्रजांची प्रस्तावना लाभली आहे. त्याला राज्य सरकारचा पुरस्कार लाभला आहे. 'मोकळिकीच्या ऋचा' या नावाने लिहिलेलं सोलापूर तरुण भारतमधील ललित लेखांचं अतिशय लोकप्रिय झालेलं सदरही पुस्तकरूपाने प्रकाशित झालं.

आध्यात्मिक क्षेत्रातील अनेक पुस्तकांचं लेखन आणि अनुवाद लताताईंनी केले. रवींद्रनाथांची 'गीतांजली', खलील जिब्रानचा 'प्रेषिताचा संदेश' आणि रिचर्ड बाकचं 'जोनाथन सीगल' असे तीन अतिशय प्रासादिक भावानुवाद लताताईंनी केले आहेत. रामकृष्ण मठासाठी स्वामी विवेकानंद चरित्र आणि स्वामी रंगनाथानंद चरित्र, विमलाजी ठकार यांच्या एका हिंदी पुस्तकाचा 'आत्मोल्लास' या नावाने प्रकाशित झालेला अनुवाद, स्वामी रंगनाथानंदांच्या पुस्तकाचा 'उपनिषदांचा संदेश' हा अनुवाद, स्वामी राम यांच्या आत्मचरित्राचा 'हिमालयातील महात्म्यांच्या सहवासात' हा अनुवाद, योगी अरविंदांच्या पुस्तकाचा 'वेदरहस्य' हा अनुवाद, सिंधी संत स्वामी अमर ज्योती यांच्या चरित्राचा अनुवाद अशी लताताईंची पुस्तकं प्रसिद्ध झाली आहेत.

एप्रिल २०२१मध्ये स्वामी माधवानंदांनी देह ठेवल्यावर त्यांचं चरित्र लताताईंनी लिहावं असं त्यांना सुचवल्यावर २०२३मध्ये त्यांनी सुमारे १०० साधकांच्या मुलाखती घेतल्या. नंतर काही महिन्यांत चरित्राचा पहिला मसुदा लिहून पूर्णही केला. त्याच्या संपादनाला आणि पुढील कामाला अजून वेळ लागेल.

**निरपेक्ष सेवामूर्ती नि सद्‍गुणांची खाण**

अत्यंत कमी, नेमकं, शब्द वेचून बोलणं आणि स्वतः अपरिमित कष्ट करून इतरांना तोषवत राहणं हे लताताईंचे खास गुण! कुणी आजारी पडलं की लताताई सेवामूर्ती बनून त्या व्यक्तीसाठी सारं काही करत. लताताईंच्या आईंना गुडघेदुखी होती. त्यांची सेवा तर त्या करतच. पण सोलापूरला शिशु-अध्यापिका विद्यालय सुरू झाल्यावर त्याच्या एक सल्लागार श्रीमती कुसुमताई आराध्ये पंढरपूरहून अनेकदा मार्गदर्शनासाठी येत. त्यांचे गुडघे दुखत. त्या मुक्कामाला असत तेव्हा रात्री न चुकता लताताई त्यांच्या गुडघ्यांना तेल लावून देत.

कोणत्याही बैठकीसाठी किंवा कार्यक्रमासाठी अथवा सोलापूरच्या प्रबोधिनीचं काम पाहण्यासाठी कोणी पाहुणे मुक्कामाला आले की पहाटे चार वाजता त्या सर्वांसाठी लताताई चहा बनवत आणि प्रत्येक खोलीच्या बाहेर ट्रेमध्ये चहाचा थर्मास व कप ठेवून देत. त्यानंतर त्यांची स्वतःची ध्यानाची वेळ असे. त्या वेळात कोणी उठलं तर त्या व्यक्तीची अडचण होऊ नये म्हणून हा प्रपंच! जवळ असणाऱ्या सगळ्यांचे वाढदिवस त्या त्या व्यक्तीच्या आवडीचे पदार्थ स्वहस्ते बनवून तिला खायला घालून साजरे करायला लताताईंना मनापासून आवडत असे. आल्यागेल्याचं उत्तम आतिथ्य, मनाची प्रांजलता, पराकोटीची विनम्रता नि आज्ञांकितता, परममृदू प्रेमवत्सलता, खोल जिव्हाळा ही लताताईंची आणखी काही गुणसंपदा!

**कृपाळू संतजन**

या बहुरंगी कार्यकर्तृत्वाला मुख्य बैठक होती अध्यात्माची. किंबहुना अध्यात्म हा त्यांच्या जीवनाचा श्वास होता आणि त्यात त्यांनी खोल अवगाहन केलं होतं. १९७७ साली स्वामी माधवनाथांचा कृपानुग्रह लताताईंना लाभला. अनेक संतांचे कृपाशीर्वाद त्यांच्या पाठीशी नित्य राहिले. सद्‍गुरू स्वामी माधवनाथ यांच्याशिवाय सुश्री विमलाजी ठकार, स्वामी माधवानंद, स्वामी मकरंदनाथ, डॉ. सुषमाताई वाटवे, सरलताई बाबर, आचार्य गोविंददेवजी गिरि, सोलापूरच्या जैन साध्वी पंडित सुमतिबेन शहा, सोलापूरचेच आण्णामहाराज पवार आणि बाबा पाटील, दत्त संप्रदायातील जनार्दन स्वामी, शिरीषदादा कवडे, रामकृष्ण मठाचे स्वामी रंगनाथानंद, स्वामी भौमानंद, स्वामी श्रीकांतानंद अशा अनेक श्रेष्ठ आध्यात्मिक विभूतींचा सहवास आणि आत्मीयता लताताईंना सहजतेने लाभली.

लताताईंची दैनंदिन ध्यानाची बैठक हे त्यांच्या प्रसन्नतेचं, तृप्ततेचं रहस्य होतं. या राजहंसाचे पंख कणखर बनवायला दीर्घकाल निरंतर चाललेली साधना कारणीभूत होती. मातापित्यांकडून लाभलेला मूळचा सात्त्विक पिंड साधनेने आणखीच तपःपूत झाला. कामाचा अतीव ताण, दगदग, अनेक कारणांनी सोसाव्या लागणाऱ्या व्यथा-वेदना यांतूनही समईच्या निवांत ज्योतीसारखं मन शांत राखण्याची अवघड किमया लताताईंनी नित्य ध्यानसाधनेने साध्य करून घेतली होती. माउलींच्या भाषेत सांगायचं तर 'जे तपोतेजाचिया राशी' असंच त्यांचं वर्णन करता येईल.

**लताताई आणि मी**

लेखाच्या समारोपाकडे येताना आमच्या दोघींमधील रेशीमबंध कसे होते याबद्दल थोडंसं! मन स्मृतितरल झालं आहे... सुमारे १९७६-७७पासून आम्ही एकत्र आलो. फर्ग्युसन रस्त्याजवळील गणेशवाडीतील 'कमलराज' या लताताईंच्या घरी अनेक मुक्काम नि तिथल्या पायऱ्यांवर रात्री चांदण्यात गप्पा मारणं, टेकडीवर फिरायला जाणं, त्या घरची रविवार बैठक, युवती विभागातलं आणि संचालक कार्यालयातलं एकत्र काम, प्रतिज्ञाग्रहणाचे कार्यक्रम, अनेक प्रकारची शिबिरं व एकत्र प्रवास, एकमेकींना लिहिलेली भावसंपुटात जपून ठेवावीत अशी अनेक पत्रं, सोलापूरला एकत्र नांदणं व काम करणं, शाळेच्या अंगणातील मोठ्या लाकडी झोपाळ्यावर झुलत किंवा सिद्धेश्वर मंदिरातील तलावाकाठी निवांत बसून मारलेल्या गप्पा, दैनंदिन युवा बैठकी व अभ्यास शिबिरांमध्ये आणि सत्संगात लताताईंकडून झालेलं श्रवण, एकमेकींचे वाढदिवस साजरे करणं, नात्यातले चढउतार अनुभवणं, प्रबोधिनीच्या दैनंदिन कामातून मी थांबल्यावर आठ वर्षांनी माचणूरला झालेल्या हृद्य भेटीतून आम्ही मनाने वेगळ्या राहू शकत नाही हे सिद्ध होणं... अशा नि अन्य कितीतरी छोट्या छोट्या स्मृती...! अनेक प्रकारचे आयाम नि तशीच उंचीही असलेलं लताताईंचं व्यक्तिमत्त्व...! मी त्या मानाने फारच साधारण व्यक्तिमत्त्व असलेली... पण तरी आमच्यात एका हळव्या गर्भरेशमी मैत्रीचे धागे विणले गेले... यात काही ईश्वरी योजनेचा आणि पूर्वसंचिताचा भाग असावा हे निःसंशय! लताताईंच्या ठायी माझ्या मनात शिक्षिका, गुरू, ज्येष्ठ गुरुभगिनी, आई, मोठी ताई, मैत्रीण... अशी अनेक नाती जोपासली गेली.

दीर्घ काल एकत्र राहिलेल्या कोणत्याही दोन माणसांचं असतं, तसंच आमच्यातही सगळंच छान, सुखाचं, गुळगुळीत होतं असं नाही. आमच्यात एकमेकींच्या न रुचणाऱ्या काही गोष्टी होत्याच. सोलापूरला सातत्याने ११ वर्षं एकत्र राहिलो तेव्हा त्या अधिक ध्यानी येऊ लागल्या. बरेचदा आमचं एकमत असे, तसंच क्वचित घटनांना दिले जाणारे प्रतिसाद वेगवेगळे असत. त्यामुळे आम्हीही एकमेकींना सोसलं, पचवलं, नि त्यातून अधिक प्रगल्भ झालो... कामासाठी अधिक योग्य झालो. एकत्र कामाचा, सहचिंतनाचा, संवादाचा पुष्कळ आनंद आण्णा, लताताई आणि मी तिघांनीही घेतला... त्या स्मृतीही जाग्या आहेत... पण नंतर आम्ही इतकी वाट चाललो की हे सगळंच खूप मागे पडलं... 'झाले मोकळे आकाश' अशी छान भावना आहे...!!

लताताईंनी मला अनेकार्थांनी घडवलं पण त्यांनी दिलेली अत्युच्च भेट म्हणजे अध्यात्माचा- मनुष्यजीवनातील अंतिम ईप्सिताचा- संस्पर्श! लताताईंनी अनेकांना बोटाला धरून पूजनीय स्वामी माधवनाथांकडे नेलं. माझ्या भाग्याने त्यांत मीही होते. ११वीच्या वयाला हे भाग्य वाट्याला आलं तेव्हा आपल्या पदरात काय पडलंय हे फारसं कळलं नव्हतं. हळूहळू उलगडत गेलं नि आता केवळ तेच एकमेव गंतव्य उरलं आहे... त्या घननीळ परमात्म्याच्या दर्शनार्थ क्षितिज खुणावत आहे... आत्मारामाच्या वाटेवर पोचण्यासाठी लताताई माझ्यासाठी 'श्रीमत् हनुमान् कीलकम्'सदृश झाल्या. या सुखनिधानाची वाट रेखून दिल्याबद्दल मी त्यांची जन्मोजन्मींची ऋणी झाले आहे. सद्गुरूंच्या चरणी नतमस्तक होण्यापूर्वी आत्यंतिक कृतज्ञतेने आपोआपच लताताईंना नमस्कार होतो. त्यांच्या आणि सर्व संत-सद्गुरूंच्या आशीर्वादांनी स्वस्वरूपी राहणं निश्चितच जमेल असा विश्वास वाटतो.

लेखात उल्लेखलेल्या सगळ्या गोष्टींमधून लताताईंचं 'स्वर्णलता' हे अनोखं नाव सार्थ ठरलं हे निःसंशयपणे सिद्ध होतं...! देवाने लताताईंना एकाच जन्मात किती समृद्ध करून या भूतलावर पाठवलं आणि ती वैभवसंपदा त्यांनी किती छानपणे जोपासली... अतिशय दुर्मीळ आहे हे!! हे सगळं लिहूनही अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्वाला शब्दांत बांधता येईल असं नाही... त्यामुळे या सर्वाच्या पलीकडच्या माझ्या लताई माउलीपर्यंत आभाळमाया पोचवण्याशिवाय काहीही मनात उमटत नाहीये...

डॉ. अशोकराव निरफराके या स्नेह्यांनी लताताईंसाठी केलेल्या काव्यातील काही ओळी अशा होत्या-

सदा सूर्य डोळ्यांत जागे तरीही  
विरागी स्मितातून ओला जिव्हाळा  
असीमान्त स्पर्शून नीडात येता  
विसावा मिळाला इथे वादळाला

अनेक व्यक्तींना वयाच्या निरपेक्ष ही आपली माउली आहे असं वाटलं... जिच्या कुशीत माझ्यासह अनेकांना अनेकदा विसावा मिळाला... जिच्या मऊसूत संजीवक हस्तस्पर्शातलं लाघव जगभरात अनेकानेक मंडळींपर्यंत अथांगपणे पोचत राहिलं... पण असा विसावा कधीतरी त्या माउलीलाही गरजेचा असेलच ना? तो लताताई आतूनच मिळवत राहिल्या... !!

हवे कुणा घर? माझे त्रिभुवन
आप्तचि सगळे सुहृद् प्रियजन
कोटिकरांनी जगदंबेने कुशित घेतले हो...

...असं म्हणत, या देह-मन-बुद्धीकडून अतिश्रम झाले, म्हणून आता त्या कायमच्या विसाव्यासाठी निघून गेल्या आहेत. खरं तर शेवटच्या काही महिन्यांत सर्व प्रकारच्या सामाजिक कार्यातून, लेखन-प्रवचनांतून मुक्ती घेऊन स्वतःसाठी जगायचं असं त्यांनी ठरवलं, पण त्यामुळे देहबंधन मर्यादित परिघात अडकवत होतं... ते त्यांच्या अंतर्मनाला मानवलंच नसावं... मुक्त छंदातली ही कविता पुरेशी आळवलीच गेली नाही... आता इतिकर्तव्यता झाली असं मानून हा जीवपक्षी देहाची खोळ त्यागून उडाला... आता मुक्त चैतन्यस्वरूप...

दिनकर मावळतीकडे झुकू लागतो तेव्हाच्या त्याच्या नितांतसुंदर रंगच्छटा मनाला मोहून टाकतात नि एक शांतिमय अस्तित्व सृष्टीला व्यापून राहतं... तसं लताताईंचं तेजोमय अस्तित्व त्यांच्या आसपासच्या जगाला उजळून टाकत असलेलं पाहताना मनाला निखळ आनंदाने मोहून टाकत असे.

बोरकरांची 'देखणे ते चेहरे' ही कविता लताताईंना अतिशय प्रिय होती. ती कविता त्यांना शब्दशः लागू पडते. त्यात म्हटल्याप्रमाणे त्यांचं जीवन म्हणजे तृप्तीचं तीर्थोदक होतं... आणि आता देहान्तसमयी देहाचं अस्तित्व अलग करून परमात्म्याच्या अनुसंधानात चित्त ठेवून कसा शांतपणे ऐहिक जगाचा निरोप घेता येतो हेही या साध्वीने आपल्याला दाखवलं आहे... लताताईंना अनंतातील प्रवासासाठी शुभास्ते पन्थानः...!!

***विशेष टीप*** *- सोलापूर आणि हराळी या दोन्ही ठिकाणी आण्णा व लताताई या दोघांच्या पश्चात अतिशय समर्थपणे त्या केंद्रांमधील बहुआयामी कार्याची धुरा सांभाळणारे अनुक्रमे डॉ. अमोल गांगजी, श्री. अभिजीत व सौ. गौरी कापरे हे तिघे आणि त्यांचे सक्षम सहकारी आहेत, तसंच हे सर्व जण अनेक नवीन दिशांनी कार्य पुढे नेत आहेत, हे विशेष नोंदणीय आहे.*